Maharashtra State
Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - 416 004

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

**अत्यंत महत्वाचे/परीक्षा प्राधान्य**

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ 3322
दिनांकः- 19 SEP 2025

प्रति,
मुख्याध्यापक,
राजारामबापू पाटील मिलीटरी स्कूल,
राजेबागेश्वर नगर, साखराळे, MIDC बहे रोड,
इस्लामपूर, ता.वाळवा,
जि.सांगली. (22.11.101)

**विषयः- कोल्हापूर विभागीय मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून आपल्या शाळेची नियुक्ती केलेबाबत.**
**संदर्भ:- जा.क्र.जिपसां/माशिवि/आस्था-9/9826/2025, दि.03.09.2025 चे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विपयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता शिराळा (9), वाळवा (11) या दोन तालुक्यांचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून आपल्या शाळेची नियुक्ती 01 ऑक्टोबर 2025 पासून पुढील तीन वर्षाकरिता करण्यात येत आहे.

वरील तालुक्यातील सर्व शाळा / क.महाविद्यालय प्रतिनिधींना मंडळाचे साहित्य वितरण केंद्रावर जमा करणे व साहित्य घेवून जाणे सोईचे व्हावे यासाठी प्रत्येक शाळेला रोटेशन प्रमाणे पुढील तीन वर्षासाठी मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच शाळांच्या संख्येनुसार आपण केलेल्या कामकाजाचे मानधन व मंडळ कार्यालयात येणे-जाणे यासाठी प्रवासभत्ता मंडळाकडून त्या-त्या वेळी अदा केला जाईल.

तरी उपरोक्त दोन तालुक्याकरिता मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून 01 ऑक्टोबर 2025 पासून पुढील तीन वर्षाकरिता काम पहावे.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 19-09-2025 15:30:53

**(सुभाष रा. चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

प्रत माहितीसाठी:-
1) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सांगली
2) मुख्याध्यापक, हजरत मोहम्मद सुलेमान उर्दू हायस्कूल, इस्लामपूर यांना कळविण्यात येते की, आपण दि.30 सप्टेंबर 2025 पर्यंत मंडळाचे वितरण केंद्राचे काम पहावयाचे आहे. तदनंतर दि.01 ऑक्टोबर 2025 पासून मंडळाने नव्याने नियुक्त केलेल्या उपरोक्त वितरण केंद्रास मंडळ कामकाजाबद्दल आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य करावे.
3) सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य शिराळा (9), वाळवा (11) यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे दि.01/10/2025 पासून मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र राजारामबापू पाटील मिलीटरी स्कूल,राजेबागेश्वर नगर, साखराळे, MIDC बहे रोड, इस्लामपूर, ता.वाळवा,जि.सांगली. (22.11.101) हे असणार आहे. त्यामुळे मंडळाचे साहित्य जमा / वितरण करण्यासाठी या नवीन वितरण केंद्रावर पाठविण्यात यावे.

AK